जालना विधानसभा मतदार संघात बुथ निहाय उमेदवारांना पडलेल्या मतदानांचा तक्ता (पान २ व पान ३)

● शनिवार, दि. ३० नोव्हेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १२२ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अॅण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

परतुर येथे लोणीकर समर्थकांचा आभार मेळावा संपन्न; समर्थकांकडून लोणीकरांचं भव्य स्वागत

महाविकास आघाडी सत्तेत असताना अराजकता माजली होती - आ. लोणीकर

महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाकरिता मंत्रिमंडळात स्थान मिळणार असल्याचा व्यक्त केला विश्वास

परतूर । प्रतिनिधी - शरद पवार यांच्या नेतृत्वातील उबाठा गटाचे नेते तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या मंत्रिमंडळातील महाविकास आघाडी सत्तेत असताना राज्यभरात अराजकता माजली होती. साधू संतांवर हल्ले होत होते. राष्ट्रीय पुरुषांवर महाविकास आघाडीतील दळभद्री नेते तोंड सुख घेत होते. भ्रष्टाचाराने बरबटलेल्या महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये तत्कालीन राज्याचे गृहमंत्री महिन्याला शंभर कोटी रुपये वसुली करत होते. त्यामुळे तत्कालीन महाविकास आघाडी सरकारला उलथवून पायाखाली घेण्याच धाडस महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दाखवल त्यांच्या पाठीशी राज्यातील भारतीय जनता पक्ष खंबीरपणाने उभा राहिला. त्यामुळे राज्याच्या राजकीय सत्तेत तडजोड करावी लागली होती. असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतूर विधानसभा मतदारसंघाची विद्यमान नवनिर्वाचित आमदार बबनराव लोणीकर यांनी केले आहे.

ते भारतीय जनता पक्षातर्फे आयोजित परतूर - मंठा - नेर - सेवली विधानसभा मतदार संघातील परतूर तालुक्यातील भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट), रयत क्रांती संघटना व मित्र पक्ष महायुतीचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्या भव्य मेळाव्यात महायुतीच्या सर्व कार्यकर्त्यांचे आभार मानत असताना बोलत होते.

यावेळी पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की महाराष्ट्रात पाणीपुरवठा व स्वच्छता खात्याची मंत्री पदाची जबाबदारी माझ्यावर असताना आपण परतूर विधानसभा मतदारसंघात सुमारे ४००० कोटी रुपये निधी विकास कामाकरता आणला असून गत पाच वर्षात विधानसभेचा सदस्य म्हणून काम करत असताना परतुर विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासाकरिता आपण ३७०० कोटी रुपये निधी आणला असून परतूर विधानसभा मतदारसंघ राज्यातील विधानसभा मतदारसंघाच्या बाबतीत विकासात अव्वल स्थानी असून मी केलेल्या विकास कामाच्या मुद्द्यावरच आपण विधानसभेच्या निवडणुकीत मतदारांना सामोरे गेल. विधानसभा मतदारसंघातील मतदार बंधू भगिनींनी विकास कामांना प्राधान्य देऊन मला पुन्हा पाचव्यांदा विधानसभेत मतदारसंघाचे नेतृत्व करण्याची संधी प्राप्त करून दिली याबद्दल विधानसभा मतदारसंघातील सर्व सामान्य मतदार बंधू-भगिनींचा मी मनःपूर्वक आभारी आहे. पुढे बोलताना माजी मंत्री नवनिर्वाचित आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की मी मुंबई येथे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची भेट घेऊन मतदार संघातील समर्थकांच्या भावना मी त्यांच्यापर्यंत पोहोचविले आहेत. तत्कालीन पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री पदाच्या खात्याचा कारभार माझ्याकडे असताना महाराष्ट्र राज्यात आपण एक कोटी स्वच्छतागृह बांधकाम करण्याकरिता प्रती लाभार्थी १२ हजार रुपये अनुदान देऊन महाराष्ट्र राज्याला हागणदारीमुक्त केला आहे. गावागावातील तांडेवाड्या वस्ती आतील खेड्यापाड्यातील नागरिकांसह शहरातील नागरिकांना पिण्याचे शुद्ध पाणी मिळावं म्हणून राज्यातील १८००० गावात मराठवाडा वॉटर ग्रीड योजना आपण यशस्वीपणे राबविले असून. हागणदारी मुक्त महाराष्ट्र आणि पिण्याचे शुद्ध पाणी राज्याला पुरविल्यामुळे महाराष्ट्रातील रोगराई नाहीशी झाली असून राज्यातील सर्वसामान्य नागरिकांचे आरोग्य सुधारलं असून साथीचे आजार आता उद्भवत नाहीत असा दावाही यावेळी आमदार लोणीकर यांनी केला. तत्कालीन मंत्रीपदाच्या कार्यकाळात खांद्यावर असलेल्या जबाबदारीचे भान ठेवून केलेल्या कामामुळे महाराष्ट्र राज्याच्या सर्वांगीण विकासाकरिता पुन्हा एकदा मंत्रिमंडळात काम करण्याची संधी मिळेल असा विश्वास देखील यावेळी आमदार लोणीकर यांनी आपल्या समर्थकांसमोर बोलताना व्यक्त केला. भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव राहुलभैया लोणीकर, भाजपा तालुकाध्यक्ष शत्रगुण कणसे, रमेश राव भापकर, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संपतराव टकले, भगवानराव मोरे दया काटे, महाराज, संभाजी वारे, नगरसेवक प्रवीण सातोनकर, कृष्णा आरगडे, निवृत्तीआप्पा लाटे, आसाराम लाटे. माणिकराव वाघमारे, बबनराव आकात, प्रकाश चव्हाण, संदीप बाहेकर अशोकराव बुरकुले, बंडू मानवतकर, तुकाराम सोळंके, बद्रीभाऊ ढवळे, गजानन लोणीकर, बबलू सातपुते, नितीन जोगदंड, दिनेश होलानी, स्वप्नील मंत्री यांच्या सह हजारो कार्यकर्ते समर्थकांची उपस्थिती होती.

युवा आदर्श

उद्दाम ...

सत्ता स्थापना बिलंब
खेळ चाले का मुद्दाम
संभ्रम घुसे मना मना
सरळ आणावे उद्दाम
शिव्या शाप देणारे ते
सगळे करती सलाम
मंत्रीमंडळ वर्णी लागो
बनू या हवेतर गुलाम
करू दे मर्कटा कसरत
तब्येतीस भला व्यायाम
मंत्री पद हाव प्रत्येकां
इच्छुकांची गर्दी जाम
डोकेदुखी इच्छुकांची
कपाळास चोपडे जाम
नशेत कसे अत्यवस्थ
न प्राशन करता जाम
चकरा जेष्ठ बंगल्यावर
जराही नसे रे विश्राम
म्हणेल ती सेवा करू
उरले कुठे दुसरे काम
माहीत नाही तयारीचे
आम्ही कसे सरंजाम
वाढू द्यावी अस्वस्थता
घ्यावे जरासे राम नाम
निष्ठेनी राहिलो सोबत
कधीतरी मिळो इनाम
नशिबी हेचं काहींच्या
प्रसिद्ध असूनि बे नाम

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

हृदयाला छिद्र असलेल्या शिवांश भोसलेवर यशस्वी उपचार

राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत करण्यात आले उपचार; दीड वर्षापूर्वी हृदयाचे ऑपरेशन झालेला शिवांश ठणठणीत

जालना । प्रतिनिधी - हृदयाला छिद्र असलेल्या जालन्याच्या शिवांश भोसले वर यशस्वी उपचार करण्यात आले असल्याची माहिती शुक्रवार (दि २९) रोजी दुपारी तीन वाजता मिळाली. राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत शिवांश वर मुंबई येथील रुग्णालयात यशस्वी उपचार करण्यात आले आहेत. शिवांशच्या हृदयाला जन्मतः छिद्र होतं. दीड वर्षांपूर्वी शिवांशच्या हृदयाचं राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत मोफत ऑपरेशन करण्यात आलं. जालन्याच्या जिल्हा सामान्य रुग्णालयाने फॉर्मलिटी पूर्ण करून शिवांशला ऑपरेशन साठी मुंबई येथे पाठवले होते. आज शिवांश बरा झाल्यानंतर डॉक्टराला दाखवण्यासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात आला होता. दीड वर्षापूर्वी हृदयाचे ऑपरेशन झालेला शीवांश आज ठणठणीत बरा झाला आहे. शिवांश त्याच्या परिवारासह जालना जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र भोसले यांच्या भेटीसाठी आला होता. यावेळी त्यांच्या कुटुंबीयांनी डॉ. भोसले यांचे आभार मानले.

संविधानाचा सन्मान अंमलात आणूनच होईल- ॲड. धन्नावत

जालना । प्रतिनिधी - संविधानाचा सन्मान फक्त प्रती वाटून नव्हे तर अंमलात आणूनच होणार असल्याने, त्यादृष्टीने तसे प्रयत्न करायला हवेत, असा आग्रह सामाजिक कार्यकर्ते ॲड. महेश सिताराम धन्नावत यांनी महानगरपालिका आयुक्तांकडे एका पत्राद्वारे केला असून, नागरी सुविधांमध्ये सुधारणा करण्याची मागणीही केली आहे.

ॲड. धन्नावत यांनी महानगरपालिकेच्यावतीने संविधानाच्या उद्देशिकेचे वाटप करण्याबद्दल प्रशंसा केली. परंतु, संविधानातील आदर्श प्रत्यक्षात आणण्यासाठी केवळ प्रतिकात्मक आयोजन पुरेसे नाही, असेही म्हटले आहे. रस्त्यांची दुरुस्ती, गटारांची स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि सार्वजनिक स्वच्छता यासारख्या नागरी मूलभूत सुविधा पुरविण्यात याव्यात, याकडे लक्ष वेधले आहे. जालना शहरातील अनेक भागात, जसे की कालीकुर्ती आणि ज्येष्ठ नागरिक शर्माजी यांच्या घराजवळील गटारांवर झाकण नाहीत, ज्यामुळे घाण आणि पाणी साचण्याची समस्या वाढत आहे. कॉलेज रोडसह शहरातील अनेक रस्त्यांची दुरावस्था झाली आहे. रस्त्यांवरील अतिक्रमणामुळे शहरात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असल्याबद्दलही चिंता व्यक्त केली. संविधानाच्या उद्देशिकेतील आदर्श आत्मसात करून जनसेवेद्वारे आपल्या कर्तव्यांचे पालन करावे, अशी विनंती ॲड. धन्नावत यांनी महानगरपालिकेला केली असून, जर असे झाले नाही, तर ते संविधानाचा अपमान ठरेल, असे म्हटले आहे. या निवेदनाची प्रत जिल्हाधिकाऱ्यांनाही देण्यात आली आहे. निवेदन देताना ॲड. महेश धन्नावत यांच्यासोबत ॲड. महेश गाडेकर हेसुद्धा उपस्थित होते.

द्वेष करणारा माणूस चांगल्या सोबत राहिला तर तोही चांगलाच होतो - हभप संजय महाराज पाचपोर

जालना । प्रतिनिधी - कितीही द्वेष करणारे माणसे असू द्यात आपण चांगल्या मार्गाने चालत राहिले तर द्वेष करणारी माणसेही तुमच्यासोबत चांगले झाल्याशिवाय राहणार नाही असे प्रतिपादन रामायणाचार्य हभप संजय महाराज पाचपोर यांनी कीर्तनातून बोलतांना केले

बदनापूर तालुक्यातील सायगाव डोंगरगाव येथील श्रीक्षेत्र पावनधाम आश्रम येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात ते बोलत होते पुढे बोलतांना महाराज म्हणाले की ज्याच्या अंतकरणात कधीच करुणा वाटत नाही तो दुर्जन असतो, आपल्याकडे धन आहे परंतु ते दुसऱ्याला देऊ शकत नाही त्याला दुर्जन असे म्हणतात, कारण नसताना दुसऱ्याशी भांडण करणारा तोही दुर्जन असतो, दुसऱ्याचे धन पाहून ज्याचे पित्त खवळते त्याला दुर्जन असे म्हणतात, आपला कोणीही द्वेष केला तरी चालेल परंतु त्याला चांगले म्हणणाऱ्या माणसालाच सज्जन म्हणतात, संत हे मायबाप आहेत तसा आईचा धर्म वेगळा तर वडिलांचा धर्म वेगळा आई ही मातृत्व असते तर वडील हे पितृत्व असते, आईचे लक्ष वेगळे आहेत तर वडिलांचे लक्षण वेगळे आहेत, आई ही सांभाळण्याचे काम करते तर वडील हे शिकविण्याचे काम करतात, जो अन्नदाता असतो, जो भयातून बाहेर काढतो जो विद्यादान करतो, तो वडीला समान असतो साधुसंत हे चंदनासारखे असतात चंदन जसे सुगंध देतात तसे साधुसंत हे माणसाच्या जीवनात आल्यास त्यालाही चंदनासारखा सुगंध मिळतो असे पाचवड महाराजांनी बोलतांना सांगितले यावेळी धर्मपिठावर हभप प्रभाकर महाराज शास्त्री, डॉक्टर प्रदीप हुसे, उद्धव महाराज घनघाव, अरुण महाराज शिरसाठ बद्रीनाथ महाराज शेळके यांची उपस्थिती होती तर पखवाज साथ संगत हभप गजानन महाराज मुळक, बळीराम महाराज गवारे, गायनाची साथ संगत सर्वश्री हभप नागेश महाराज नानकिल्ले तुळशीराम महाराज दाभाडे, रवींद्र महाराज मदने, दादासाहेब महाराज पाटील, विलास बापू देशमुख यांनी केली.

Serial No.	Serial No. Of Polling Station	ARJUN PANDITRAO KHOTKAR	KISHOR YADAV BORUDE	KAILAS KISANRAO GORANTYAL	ASADULLA SHAIKH AMAN ULLA SHAHA	DAVID PRALHAD RAO DHUMARE	NEELA GAUTAM KAKDE	MILIND BALU BORDE	ADV.YOGESH DATTU GULLAPELLI	VIKAS CHHAGAN LAHANE	VIJAY PANDITRAO WADHEKAR	VINOD RAJABHAU MAVKAR	ANWAR QURESHI SALIM QURESHI	ANIS SHAMSHODDIN SAYYAD	AFSAR FARIDSHAIKH CHOUDHARI	ABDUL HAFIZ ABDUL GAFFAR	ARJUN DADA PATIL BHANDARGE	ARJUN SUBHASH KANISE	ASHOK ALIS LAXMIKANT MANOHAR PANGARKAR	ANANDA LIMBAJI THOMBARE	KUNDLIK VITTHAL WAKHARE	GANESH DADARAO KAVLE	YOGESH SAKHARAM KADAM	RATAN ASARAM LANDGE	VISHAL LAXMAN HIWALE	SAPNA VINOD SURADKAR	ADV. SANJAY RAGHUNATH RAUNDALE	Total of Valid Votes	No. Of Rejected Votes	NOTA	Total	No. Of Tendered Votes
1	1	458	5	65	2	5	0	2	1	0	1	0	0	1	1	0	9	4	1	0	0	0	0	0	1	0	0	556	0	1	557	0
2	2	404	3	362	1	27	0	1	1	1	0	0	0	0	2	1	3	0	2	1	2	0	0	0	1	0	0	812	0	2	814	0
3	3	432	4	194	2	108	0	1	0	3	0	0	1	0	0	1	3	6	5	0	2	0	0	0	4	0	0	766	0	2	768	0
4	4	319	12	245	0	121	1	0	0	0	0	0	0	1	3	0	2	1	10	0	0	0	1	1	1	1	0	719	0	3	722	0
5	5	257	4	259	5	94	1	1	0	0	0	0	0	0	1	26	1	2	8	0	0	0	0	0	0	0	0	659	0	1	660	0
6	6	262	5	230	1	69	0	0	0	0	0	0	0	0	1	29	5	1	17	0	0	0	1	0	0	0	0	621	0	3	624	0
7	7	408	6	484	6	13	1	4	0	1	0	0	0	2	3	77	2	2	6	1	0	3	0	0	0	1	2	1022	0	5	1027	0
8	8	302	0	212	2	1	0	0	0	0	0	0	0	1	0	0	2	2	4	1	0	0	0	0	0	0	0	527	0	1	528	0
9	9	446	5	308	0	44	1	0	1	6	2	0	2	2	2	1	7	7	1	5	1	1	1	0	2	0	1	846	0	7	853	0
10	10	605	18	144	1	64	4	2	0	2	3	2	0	3	3	53	10	4	9	0	0	2	1	1	3	0	3	937	0	2	939	0
11	11	469	11	156	2	91	1	4	1	8	1	1	0	0	1	89	7	5	24	2	1	1	1	0	0	1	0	877	0	2	879	1
12	12	488	1	169	0	20	0	0	0	1	0	0	0	0	0	0	0	1	5	0	0	0	0	0	0	0	0	685	0	1	686	0
13	13	205	1	190	4	119	0	0	0	3	0	1	1	0	0	1	1	1	1	0	0	2	0	2	2	0	0	534	0	0	534	0
14	14	573	1	172	0	18	0	0	0	0	1	0	0	0	1	0	3	4	5	1	0	0	0	1	0	0	0	780	0	2	782	0
15	15	596	4	199	3	32	0	1	0	2	0	0	0	0	0	2	2	0	4	1	2	0	0	1	0	0	0	849	0	4	853	0
16	16	725	1	214	0	7	0	0	0	0	0	0	1	0	0	0	2	0	0	0	0	0	0	0	0	0	0	950	0	1	951	0
17	17	155	8	140	2	16	0	3	0	1	0	0	2	1	1	1	1	2	0	3	1	0	1	0	1	0	0	339	0	1	340	0
18	18	455	5	302	4	75	1	0	1	0	0	0	0	0	0	0	4	2	3	1	1	0	1	0	0	1	0	856	0	0	856	0
19	19	433	3	153	2	62	1	1	0	1	0	0	0	0	2	1	9	6	3	1	1	1	0	1	0	0	1	682	0	4	686	0
20	20	649	6	160	2	25	0	0	1	0	0	0	2	3	2	1	5	6	1	0	0	0	1	0	1	0	1	866	0	2	868	0
21	21	365	2	272	0	51	0	1	0	2	0	0	0	0	0	4	1	3	0	0	0	0	1	0	0	0	0	702	0	0	702	0
22	22	249	1	294	1	75	0	1	0	1	1	0	1	0	0	3	3	4	2	1	0	2	0	0	1	0	1	641	0	3	644	0
23	23	292	6	268	2	126	1	0	0	2	0	0	1	0	1	2	5	4	2	1	0	0	0	0	1	0	1	715	0	5	720	0
24	24	514	4	431	4	5	2	1	0	1	0	1	0	0	2	0	2	4	1	1	0	1	1	0	0	0	0	975	0	4	979	0
25	25	398	1	199	2	7	1	0	0	1	0	0	0	0	0	22	0	3	0	0	0	0	0	5	0	1	0	1	641	0	0	641	0
26	26	390	2	164	0	10	0	0	0	0	0	1	0	0	0	11	3	0	2	0	0	0	11	0	0	0	1	595	0	2	597	0
27	27	272	4	242	1	36	0	2	0	1	1	0	0	1	1	1	4	0	3	1	1	1	0	0	0	0	3	575	0	4	579	0
28	28	629	3	165	1	125	0	3	1	1	0	1	0	1	0	0	3	6	6	1	3	1	0	0	3	0	0	953	0	2	955	0
29	29	152	0	54	0	200	1	1	1	3	0	0	0	1	0	0	1	0	0	2	1	0	1	0	2	0	0	420	0	1	421	0
30	30	436	7	294	3	153	0	4	0	0	2	0	0	1	0	0	3	3	3	2	1	0	0	0	1	0	0	913	0	0	913	0
31	31	254	2	243	2	17	0	0	0	0	0	0	0	0	1	35	3	1	0	0	0	0	0	0	0	0	0	558	0	1	559	0
32	32	393	1	214	1	8	1	1	0	0	0	0	0	0	0	34	1	3	0	1	0	0	0	2	0	0	1	661	0	2	663	0
33	33	489	3	273	4	13	3	2	0	1	10	0	1	1	0	117	10	3	3	1	1	1	1	0	0	1	2	940	0	1	941	0
34	34	596	3	209	2	15	0	0	0	0	1	0	0	0	0	11	3	1	4	0	0	0	0	0	0	0	0	845	0	2	847	0
35	35	306	4	144	1	8	0	2	0	0	2	1	0	0	0	0	1	2	0	1	0	0	0	0	0	0	0	472	0	1	473	0
36	36	438	7	230	3	20	1	0	0	0	0	0	2	1	0	24	2	4	1	1	0	0	1	0	3	1	1	740	0	5	745	0
37	37	531	5	152	2	52	1	0	0	0	4	0	0	1	0	44	4	1	0	1	0	0	1	0	1	1	1	802	0	1	803	0
38	38	527	4	183	0	89	2	3	0	3	1	1	0	0	3	57	7	6	0	3	0	3	0	2	2	1	4	901	0	4	905	0
39	39	287	63	169	1	28	0	0	1	2	0	0	0	0	1	3	2	1	1	2	0	0	0	0	2	1	0	564	0	1	565	0
40	40	576	6	100	1	9	2	1	0	5	0	0	1	0	2	1	7	5	0	0	0	1	1	0	1	1	0	720	0	3	723	0
41	41	475	3	358	2	68	1	3	1	0	0	0	0	0	3	0	0	8	2	0	1	3	0	0	2	1	1	932	0	2	934	0
42	42	619	8	412	6	28	1	0	0	4	2	1	0	1	4	0	7	5	3	2	1	5	1	0	2	0	2	1114	0	8	1122	0
43	43	163	2	182	2	4	0	4	0	0	0	0	1	1	1	303	4	1	1	1	2	0	1	0	0	0	5	678	0	3	681	1
44	44	104	0	125	2	5	1	2	0	1	1	0	0	1	4	185	1	1	1	2	0	0	0	0	0	1	1	438	0	1	439	0
45	45	160	0	86	0	3	1	2	0	0	0	0	1	0	3	76	1	0	2	0	0	0	1	0	0	0	0	336	0	2	338	0
46	46	313	0	175	0	3	0	1	0	0	0	0	0	0	1	2	2	5	3	5	0	1	2	0	0	0	0	513	0	3	516	0
47	47	329	10	178	4	9	0	1	0	0	0	2	1	0	4	118	6	5	5	1	0	1	0	0	0	0	0	674	0	4	678	0
48	48	318	11	267	4	20	0	0	1	0	0	0	1	0	0	107	3	5	1	3	2	0	0	0	0	1	0	744	0	4	748	0
49	49	221	14	253	7	23	1	2	0	0	1	0	1	1	4	176	6	4	0	1	0	0	0	1	3	0	2	721	0	2	723	0
50	50	215	5	180	18	6	1	0	0	0	0	0	0	1	1	153	3	2	0	0	1	0	0	0	0	0	1	587	0	5	592	0
51	51	204	8	213	16	15	0	2	0	0	1	0	1	1	3	141	5	0	0	2	0	0	0	0	0	1	0	613	0	0	613	1
52	52	262	15	188	4	12	0	0	0	0	0	0	1	1	1	133	2	2	0	0	1	0	0	1	0	1	1	625	0	1	626	0
53	53	248	7	157	2	9	2	3	0	1	0	0	1	0	3	51	4	4	1	1	0	0	1	0	0	0	0	495	0	4	499	0
54	54	254	2	159	0	22	0	1	0	0	0	0	0	2	1	21	0	1	41	1	0	0	0	0	0	0	0	505	0	3	508	0
55	55	237	3	185	5	12	0	2	0	1	0	0	0	6	3	45	4	3	25	2	0	0	0	0	0	0	2	535	0	0	535	0
56	56	332	3	295	7	35	1	0	0	0	0	1	0	1	4	63	1	3	58	2	0	1	0	0	0	0	0	807	0	0	807	0
57	57	256	5	322	5	42	0	1	0	0	1	0	0	0	2	104	3	3	29	1	1	0	0	0	1	1	1	778	0	0	778	0
58	58	343	7	229	10	52	0	0	0	0	0	1	1	0	7	45	1	0	42	1	0	0	0	0	1	0	0	740	0	2	742	0
59	59	331	8	260	0	61	0	0	0	0	1	0	2	1	4	24	7	5	23	1	0	0	0	0	1	0	0	729	0	1	730	0
60	60	200	2	350	15	43	1	1	1	0	0	0	2	0	9	126	2	1	13	2	1	0	0	0	0	0	2	771	0	5	776	0
61	61	261	0	283	8	14	2	1	0	0	0	0	0	0	2	143	2	1	12	2	0	0	0	0	0	1	0	732	0	2	734	0
62	62	109	1	199	3	5	0	0	0	0	0	0	0	0	3	150	1	1	2	0	0	0	0	1	0	0	1	476	0	1	477	0
63	63	128	1	166	3	2	0	2	0	0	0	0	0	0	1	131	1	1	6	0	0	1	0	0	0	1	1	444	0	1	445	0
64	64	209	3	259	8	3	0	3	0	1	0	0	0	1	1	210	4	2	1	3	0	0	0	0	0	1	2	711	0	1	712	0
65	65	122	0	293	11	3	0	3	0	1	0	0	0	2	1	176	3	3	0	0	1	0	0	0	0	1	2	622	0	2	624	0
66	66	349	2	198	0	0	0	0	1	0	0	0	0	0	1	27	1	1	6	1	0	0	0	0	0	0	0	587	0	0	587	0
67	67	265	0	133	1	0	0	0	0	1	0	0	0	0	1	20	1	0	4	0	0	0	0	0	0	0	0	426	0	2	428	0
68	68	309	0	229	4	0	0	0	0	0	0	0	0	0	1	102	0	0	2	1	0	0	0	0	1	1	0	650	0	0	650	0
69	69	341	0	153	1	0	0	0	0	0	0	0	0	1	1	93	2	2	4	0	0	0	0	0	0	2	0	600	0	3	603	0
70	70	405	0	262	1	1	0	0	0	0	1	0	0	0	7	42	3	1	1	0	1	0	0	0	0	0	0	725	0	1	726	0
71	71	381	3	221	1	5	1	0	0	0	0	0	0	1	1	58	2	2	5	0	0	0	0	0	0	0	1	682	0	5	687	0
72	72	383	0	271	1	13	0	1	1	0	1	1	0	0	0	44	1	0	3	0	0	0	1	0	1	0	0	722	0	2	724	0
73	73	536	1	235	0	19	0	0	0	1	0	0	0	0	1	75	1	3	3	1	0	0	0	0	2	0	1	879	0	3	882	0
74	74	496	1	274	3	10	0	0	0	0	2	0	0	0	4	68	3	0	7	1	0	0	0	1	0	0	0	870	0	6	876	0
75	75	374	0	167	1	3	0	1	1	1	0	0	0	0	1	42	2	0	8	0	0	1	0	0	1	2	0	605	0	1	606	0
76	76	303	0	134	0	5	1	2	0	1	0	0	0	1	1	44	1	2	6	0	0	0	1	0	0	0	1	503	0	3	506	0
77	77	337	0	281	2	0	0	0	0	0	0	0	0	1	5	112	3	1	4	0	0	0	0	0	0	0	0	746	0	4	750	0
78	78	464	1	230	2	4	0	0	0	0	0	0	0	0	0	42	1	1	14	0	0	0	0	0	0	0	0	759	0	1	760	0
79	79	433	1	194	1	2	0	0	0	0	0	0	0	1	0	8	2	0	20	0	0	0	0	0	0	3	0	665	0	4	669	0
80	80	302	1	136	0	2	0	0	0	0	0	2	0	0	0	16	1	1	11	0	0	0	0	0	0	2	0	474	0	1	475	0
81	81	369	3	179	0	6	1	0	1	4	0	1	0	0	0	18	0	1	13	0	0	0	1	0	0	0	0	597	0	4	601	0
82	82	434	3	215	1	1	0	0	0	1	0	0	0	1	0	30	3	5	5	3	0	0	0	0	0	0	0	702	0	3	705	0
83	83	369	2	211	5	0	0	0	0	0	0	0	0	1	9	211	4	2	5	1	1	0	0	0	0	0	2	823	0	0	823	0
84	84	290	9	221	4	1	2	1	1	0	0	0	0	1	10	291	3	4	17	0	0	1	0	2	0	0	1	859	0	0	859	0
85	85	397	1	267	5	2	0	1	0	0	0	0	1	0	0	26	1	3	22	1	0	0	0	0	0	1	0	728	0	4	732	0
86	86	401	0	240	0	2	1	0	0	0	0	0	0	1	1	37	0	2	18	0	0	0	0	0	0	0	0	703	0	2	705	0
87	87	494	2	262	5	0	1	1	0	0	0	1	0	0	3	63	1	1	12	0	0	2	0	0	0	0	0	848	0	5	853	0
88	88	396	1	234	0	0	0	0	1	0	0	0	0	1	1	39	3	1	23	0	0	0	0	0	0	0	0	700	0	0	700	1
89	89	184	1	216	41	2	0	1	0	0	0	0	0	1	4	204	1	0	5	0	0	0	0	0	0	0	1	661	0	2	663	0
90	90	412	0	156	1	0	0	0	0	0	0	0	0	0	0	3	0	3	5	0	0	0	0	0	0	0	0	580	0	3	583	0
91	91	92	0	186	2	0	0	0	0	0	0	0	0	1	3	103	2	0	5	2	0	0	0	1	0	1	1	399	0	0	399	0
92	92	332	1	107	0	0	0	0	0	0	0	0	0	0	3	11	2	4	13	0	0	0	0	0	0	0	0	473	0	1	474	0
93	93	315	0	104	0	0	0	0	0	0	1	0	0	0	0	1	2	1	4	0	0	0	0	0	0	0	0	428	0	2	430	0
94	94	347	3	243	0	6	0	0	0	0	0	0	1	1	0	56	3	0	4	1	0	1	0	0	0	0	0	666	0	4	670	0
95	95	291	3	175	1	1	0	0	0	0	0	0	0	0	1	9	0	4	5	3	0	0	0	0	0	0	0	493	0	1	494	0
96	96	295	0	318	1	6	0	1	0	0	0	1	0	0	0	18	0	0	5	0	0	0	0	0	0	0	0	645	0	3	648	0
97	97	240	0	336	0	10	1	0	1	0	2	0	0	0	0	14	2	0	6	0	0	0	0	0	0	0	0	612	0	2	614	0
98	98	313	1	372	0	2	0	0	0	0	0	0	0	0	0	26	1	1	3	1	0	0	0	0	0	0	0	720	0	0	720	0
99	99	157	1	193	0	6	1	1	0	0	1	0	0	1	0	9	0	0	1	0	0	0	0	0	0	0	0	371	0	2	373	0
100	100	275	0	263	0	7	0	0	0	0	0	0	0	0	0	20	1	1	1	0	0	0	0	0	0	0	0	568	0	2	570	0
101	101	290	0	312	1	7	0	2	0	0	0	1	0	0	0	24	1	2	5	0	0	0	0	0	0	0	0	645	0	4	649	0
102	102	252	4	295	2	10	0	0	0	0	0	0	0	0	0	42	0	0	5	0	0	0	0	0	0	0	0	610	0	3	613	0
103	103	204	3	212	1	8	0	0	1	0	0	1	0	0	1	38	1	0	3	1	1	0	0	0	0	0	0	475	0	3	478	0
104	104	232	2	325	1	13	0	0	1	0	0	0	0	0	2	142	3	0	3	0	0	0	0	0	0	0	0	724	0	1	725	0
105	105	324	2	294	0	16	0	0	1	1	0	0	0	1	2	92	1	3	10	0	0	0	1	0	0	0	0	748	0	4	752	0
106	106	506	2	234	2	13	0	0	0	1	0	0	1	0	1	53	2	1	10	0	0	0	0	0	0	0	0	826	0	3	829	0
107	107	353	0	245	7	18	1	2	0	0	0	0	1	1	2	99	1	1	10	0	1	1	0	0	0	0	0	743	0	9	752	0
108	108	187	1	135	9	8	0	0	0	2	0	0	0	0	0	161	0	2	0	1	0	0	0	0	0	0	2	508	0	4	512	0
109	109	280	2	165	6	6	0	1	11	0	0	0	0	0	2	119	4	1	1	1	0	1	0	0	0	1	3	604	0	6	610	0
110	110	286	2	207	5	8	1	1	1	3	1	0	0	1	1	115	1	2	5	0	0	0	0	0	0	0	1	641	0	5	646	0
111	111	430	2	211	6	11	1	2	1	0	1	0	1	1	1	202	5	6	2	1	0	0	0	0	0	0	2	886	0	1	887	0
112	112	228	0	145	11	5	0	0	0	0	1	0	0	0	4	213	7	0	4	0	0	0	0	0	1	1	0	620	0	3	623	0
113	113	295	6	222	13	8	1	0	0	0	0	0	0	2	3	295	4	6	0	2	0	1	0	0	0	2	1	861	0	6	867	0
114	114	178	1	311	1	4	0	0	1	0	0	0	0	0	0	12	3	2	0	1	0	0	0	0	1	0	0	515	0	1	516	0

Serial No.	Serial No. Of Polling Station	ARJUN PANDITRAO KHOTKAR	KISHOR YADAV BORUDE	KAILAS KISANRAO GORANTYAL	ASADULLA SHAIKH AMAN ULLA SHAHA	DAVID PRALHAD RAO DHUMARE	NEELA GAUTAM KAKDE	MILIND BALU BORDE	ADV.YOGESH DATTU GULLAPELLI	VIKAS CHHAGAN LAHANE	VIJAY PANDITRAO WADHEKAR	VINOD RAJABHAU MAVKAR	ANWAR QURESHI SALIM QURESHI	ANIS SHAMSHODDIN SAYYAD	AFSAR FARIDSHAIKH CHOUDHARI	ABDUL HAFIZ ABDUL GAFFAR	ARJUN DADA PATIL BHANDARGE	ARJUN SUBHASH KANISE	ASHOK ALIS LAXMIKANT MANOHAR PANGARKAR	ANANDA LIMBAJI THOMBARE	KUNDLIK VITTHAL WAKHARE	GANESH DADARAO KAVLE	YOGESH SAKHARAM KADAM	RATAN ASARAM LANDGE	VISHAL LAXMAN HIWALE	SAPNA VINOD SURADKAR	ADV. SANJAY RAGHUNATH RAUNDALE	Total of Valid Votes	No. Of Rejected Votes	NOTA	Total	No. Of Tendered Votes
177	177	201	1	104	0	14	0	1	0	2	0	0	0	0	1	233	5	2	1	1	0	0	0	0	0	0	1	567	0	2	569	0
178	178	220	1	127	2	14	0	0	0	1	0	2	1	2	2	157	4	0	8	1	0	0	0	0	1	0	1	544	0	4	548	0
179	179	249	6	136	4	39	0	0	0	1	1	0	0	0	2	270	5	2	4	1	0	0	1	0	0	0	0	721	0	4	725	0
180	180	85	1	151	2	0	0	3	0	0	0	0	0	0	3	383	2	0	0	1	0	0	0	0	0	0	2	633	0	0	633	0
181	181	79	1	155	5	22	0	2	0	0	0	0	1	3	3	518	2	0	3	2	0	0	0	0	0	0	1	797	0	2	799	0
182	182	313	2	97	4	1	0	1	0	0	0	0	2	0	0	59	4	0	4	0	0	0	0	0	0	0	0	487	0	0	487	0
183	183	202	2	65	0	0	0	0	0	0	0	0	0	0	0	73	5	3	3	0	0	0	0	0	0	0	2	355	0	0	355	0
184	184	215	0	105	2	1	1	3	0	0	1	0	0	2	3	161	2	2	1	3	0	0	0	0	0	0	1	503	0	1	504	0
185	185	23	1	160	4	0	1	5	0	0	0	1	0	1	1	346	2	1	0	0	1	0	0	0	0	0	2	549	0	0	549	0
186	186	202	0	64	2	2	0	0	0	0	0	1	1	0	1	47	3	0	6	0	0	0	0	0	0	0	0	329	0	2	331	0
187	187	281	3	106	1	3	0	1	0	1	0	0	0	0	1	18	1	0	11	1	0	0	0	0	0	1	0	429	0	2	431	0
188	188	286	0	143	4	3	0	1	0	0	0	0	0	0	3	120	2	0	16	0	0	0	0	0	0	0	1	579	0	3	582	0
189	189	123	1	183	4	1	0	1	0	1	0	0	1	0	2	362	3	2	1	1	0	0	0	0	0	0	0	686	0	2	688	0
190	190	58	2	274	6	0	2	4	0	0	0	0	0	1	7	442	3	0	0	1	0	0	0	0	0	3	0	803	0	1	804	0
191	191	360	0	154	6	5	0	2	1	0	0	0	4	1	1	220	10	1	4	0	0	0	0	0	0	0	3	772	0	2	774	0
192	192	129	2	144	4	13	0	0	0	0	1	1	2	1	2	226	4	0	1	0	0	0	0	1	0	0	0	531	0	2	533	0
193	193	23	2	153	3	1	0	3	0	0	0	0	5	0	3	366	5	1	1	1	0	0	1	0	1	0	6	575	0	4	579	0
194	194	36	1	156	11	0	0	6	0	0	0	1	7	1	4	294	2	0	0	2	0	0	0	0	0	1	4	526	0	1	527	0
195	195	254	1	258	8	0	0	2	0	0	0	0	0	0	0	255	4	3	25	0	0	0	0	0	0	1	0	811	0	0	811	0
196	196	291	9	256	3	36	0	1	0	0	0	1	0	0	1	194	7	2	1	0	0	0	1	1	0	0	2	806	0	1	807	0
197	197	41	1	184	2	5	0	0	0	0	0	0	0	1	1	328	3	1	1	0	1	0	1	0	0	0	0	570	0	0	570	0
198	198	127	1	104	1	16	0	0	0	0	0	0	1	0	1	116	1	0	3	0	0	0	0	0	0	0	1	372	0	1	373	0
199	199	313	0	170	2	1	0	2	0	0	0	0	0	0	0	121	1	6	12	0	0	1	0	0	0	0	1	630	0	0	630	0
200	200	432	3	151	2	1	0	1	0	0	0	0	0	1	1	94	4	2	18	1	1	0	0	0	0	0	0	712	0	1	713	0
201	201	422	4	81	2	0	0	0	0	0	0	0	0	0	0	13	4	1	14	0	0	0	1	0	0	0	0	542	0	1	543	0
202	202	343	2	179	1	9	0	3	0	0	1	1	0	0	0	104	7	0	13	0	0	0	1	0	0	0	0	664	0	3	667	0
203	203	423	2	144	2	6	1	2	0	1	1	1	0	1	0	94	3	2	30	0	0	0	0	0	0	0	2	715	0	7	722	0
204	204	216	0	162	2	7	0	1	0	0	0	1	0	0	1	165	4	2	22	0	1	0	0	0	0	1	1	585	0	3	588	0
205	205	330	0	169	2	11	0	0	0	0	0	0	0	1	1	118	3	1	32	1	0	0	0	0	0	1	0	670	0	4	674	0
206	206	340	0	147	0	9	0	0	0	0	0	1	0	0	0	12	0	0	23	0	0	0	0	0	0	0	0	532	0	2	534	0
207	207	231	0	105	2	6	1	3	0	0	0	0	0	0	1	57	1	2	30	0	0	1	0	0	0	0	0	440	0	4	444	0
208	208	254	3	285	1	33	1	1	2	0	0	0	0	0	2	13	0	1	3	1	0	0	0	0	1	0	0	601	0	2	603	0
209	209	249	3	208	1	31	0	0	0	0	0	0	0	1	3	7	2	4	5	4	0	0	0	0	2	1	1	522	0	4	526	0
210	210	317	1	222	0	24	0	1	0	0	0	0	0	0	1	7	3	1	2	2	0	0	0	0	4	1	0	586	0	5	591	0
211	211	272	3	283	1	16	0	0	0	0	0	1	0	0	0	12	2	1	11	0	1	1	0	0	2	0	0	606	0	4	610	0
212	212	135	0	211	1	0	0	0	0	0	0	0	0	1	5	278	5	3	5	0	0	0	0	0	0	1	2	647	0	3	650	0
213	213	156	2	131	3	0	0	0	0	0	0	1	0	0	0	128	1	2	12	0	0	1	0	0	0	0	0	437	0	2	439	0
214	214	144	1	135	2	0	0	1	0	0	0	1	0	0	1	255	2	1	21	1	0	0	0	0	0	1	1	567	0	2	569	0
215	215	189	1	161	4	1	0	2	0	0	1	0	0	2	2	229	2	1	20	0	0	0	0	0	0	0	0	615	0	1	616	0
216	216	265	1	138	5	0	0	1	0	0	0	3	0	1	0	115	3	1	41	0	0	0	0	0	0	0	0	574	0	2	576	0
217	217	145	3	173	6	1	0	1	0	0	0	0	0	0	2	351	5	0	16	1	0	0	0	0	0	0	0	704	0	1	705	0
218	218	277	6	176	3	1	1	1	1	0	0	0	0	0	3	85	6	3	3	0	0	0	0	0	1	0	2	569	0	1	570	0
219	219	269	1	131	1	0	0	1	0	0	0	0	0	1	0	115	3	1	7	1	0	1	0	0	0	0	1	533	0	3	536	0
220	220	131	2	178	4	1	0	2	0	0	0	1	0	4	3	266	4	1	1	1	0	0	0	0	0	1	2	602	0	3	605	1
221	221	199	0	129	1	1	0	1	0	0	0	3	0	0	2	62	3	3	1	3	0	0	0	0	1	0	2	411	0	2	413	0
222	222	329	3	271	2	3	1	0	0	0	0	0	0	1	2	44	2	1	2	2	0	0	0	0	0	0	1	664	0	2	666	0
223	223	370	1	221	0	2	0	0	0	0	0	1	0	0	0	59	1	3	13	0	0	0	0	0	0	0	0	671	0	1	672	0
224	224	299	2	211	1	1	0	1	0	0	0	0	0	1	0	63	1	0	20	0	0	0	0	0	0	0	1	601	0	2	603	0
225	225	218	3	245	1	58	0	0	0	0	0	0	0	0	1	90	1	0	5	0	0	0	0	0	2	2	0	627	0	2	629	0
226	226	201	12	294	0	58	2	0	0	0	3	0	0	0	2	89	3	2	6	0	2	1	0	1	0	0	0	676	0	3	679	0
227	227	275	8	309	0	37	0	2	0	0	0	0	0	2	1	191	5	2	10	2	0	2	3	0	1	0	1	851	0	3	854	0
228	228	354	2	187	1	2	0	0	0	0	0	1	0	0	0	8	0	0	24	0	0	0	0	0	1	0	0	580	0	3	583	0
229	229	272	1	214	0	14	0	0	0	0	0	0	0	0	1	34	1	0	12	0	0	0	0	0	0	0	0	549	0	4	553	1
230	230	339	2	247	2	18	0	1	0	0	0	0	0	1	3	34	0	0	17	0	0	0	0	0	0	0	0	664	0	5	669	0
231	231	258	5	242	0	5	0	0	0	0	0	0	0	0	0	17	0	0	5	1	0	0	0	0	0	0	0	533	0	5	538	0
232	232	385	1	287	1	27	1	0	0	0	1	0	0	0	1	10	0	0	9	0	0	0	0	0	2	1	0	726	0	8	734	0
233	233	277	0	285	1	18	0	1	0	0	0	0	1	1	0	79	7	2	4	2	1	1	0	0	0	0	0	680	0	3	683	0
234	234	348	4	260	4	15	0	0	0	0	0	1	0	0	0	34	1	1	4	0	0	1	0	0	0	1	0	674	0	1	675	0
235	235	420	6	194	2	17	0	0	0	2	0	2	0	0	0	78	4	2	12	2	0	0	0	0	0	0	2	743	0	1	744	0
236	236	368	4	255	0	15	0	1	0	0	0	0	0	0	0	83	8	3	7	1	2	0	0	0	1	0	3	751	0	3	754	2
237	237	374	3	212	4	12	0	2	0	0	0	0	0	1	3	99	8	4	9	0	1	0	0	0	1	0	2	735	0	4	739	0
238	238	279	2	249	3	12	0	3	0	2	1	0	0	0	2	137	4	1	7	0	0	0	1	0	0	0	0	703	0	2	705	0
239	239	197	2	159	1	4	0	0	0	0	0	0	0	0	1	23	0	0	3	0	0	0	0	0	0	0	0	390	0	1	391	0
240	240	196	0	216	0	9	0	0	0	0	0	0	0	0	0	18	0	2	9	0	0	1	0	0	1	1	0	453	0	3	456	0
241	241	288	2	185	0	4	0	0	0	0	2	0	0	0	0	15	0	0	9	0	0	0	0	0	0	0	0	505	0	6	511	0
242	242	363	0	346	3	24	0	1	0	1	1	0	0	2	1	21	3	2	5	3	0	0	0	2	0	0	0	778	0	4	782	0
243	243	353	3	258	0	10	0	0	0	1	0	2	0	0	0	6	0	0	6	1	0	1	0	0	0	0	0	641	0	3	644	0
244	244	273	3	217	2	6	1	1	1	0	0	0	0	0	0	13	0	3	13	1	0	1	0	0	0	0	0	535	0	1	536	0
245	245	304	8	287	2	24	0	5	0	0	1	1	1	0	4	42	4	4	4	3	2	1	1	0	1	2	1	702	0	2	704	0
246	246	252	1	284	3	26	0	0	0	1	0	0	0	1	0	49	2	2	1	0	0	0	0	0	1	1	0	624	0	5	629	0
247	247	334	8	299	0	16	0	2	0	0	0	0	0	0	4	27	2	0	4	0	0	1	0	2	0	0	0	699	0	2	701	0
248	248	198	4	316	3	24	0	0	0	0	0	0	0	1	2	31	1	0	2	0	0	0	0	1	2	0	0	585	0	2	587	0
249	249	206	3	262	2	17	1	0	0	0	1	0	0	0	2	13	2	1	5	0	0	1	0	0	3	0	0	519	0	3	522	0
250	250	158	3	195	0	14	1	2	0	0	2	0	0	0	0	4	3	0	1	0	0	0	0	0	0	0	0	383	0	5	388	0
251	251	197	8	201	0	17	0	1	0	1	2	0	0	0	0	3	0	0	2	1	0	0	1	0	0	0	0	434	0	0	434	0
252	252	202	0	216	1	2	1	3	0	0	0	0	0	0	3	208	1	0	6	0	0	0	0	0	0	1	2	646	0	0	646	0
253	253	454	3	262	1	3	0	0	0	0	4	1	0	0	1	48	3	1	7	0	0	0	1	0	0	0	0	789	0	3	792	0
254	254	373	1	269	4	0	0	0	0	0	4	2	0	0	2	45	1	3	6	0	0	0	0	0	0	0	0	710	0	7	717	0
255	255	226	0	177	2	0	0	1	0	0	2	0	0	0	0	85	1	1	6	0	1	0	1	0	0	0	3	506	0	3	509	0
256	256	166	2	188	1	9	0	0	0	0	0	0	1	1	0	293	5	0	3	0	0	0	0	0	0	0	2	671	0	1	672	0
257	257	231	0	132	0	0	0	1	0	1	0	0	0	0	1	69	0	4	15	2	0	0	0	0	0	0	0	456	0	0	456	0
258	258	190	2	109	1	3	0	0	0	0	1	1	0	0	1	57	0	0	9	0	0	0	0	0	0	0	0	374	0	3	377	0
259	259	291	4	263	4	4	0	1	0	1	0	2	0	0	0	242	4	0	12	1	0	0	0	0	0	0	1	830	0	6	836	0
260	260	331	0	202	0	1	0	0	0	0	0	0	0	0	0	11	0	2	7	0	0	1	0	0	0	0	0	555	0	0	555	0
261	261	297	0	198	1	1	0	0	1	0	0	0	0	0	1	9	1	0	13	0	0	1	0	0	0	0	0	523	0	4	527	0
262	262	238	0	265	1	0	0	0	0	0	0	0	1	1	2	3	3	1	2	0	2	4	0	0	0	0	0	523	0	1	524	0
263	263	284	1	268	1	0	0	0	0	0	1	0	1	0	1	9	5	1	4	1	0	0	0	1	0	0	0	578	0	2	580	0
264	264	158	1	327	1	0	0	0	0	0	0	1	0	0	1	22	1	0	2	2	0	1	0	0	0	1	1	519	0	2	521	0
265	265	126	0	146	0	1	1	2	0	1	0	0	0	0	0	17	0	1	0	0	0	0	0	0	0	0	0	295	0	2	297	0
266	266	435	1	282	11	38	0	2	0	0	0	0	0	0	0	83	1	1	4	0	0	0	0	0	0	0	0	858	0	0	858	0
267	267	355	1	266	0	22	0	2	1	2	0	0	0	2	1	78	4	1	0	0	1	1	2	0	0	0	0	739	0	1	740	0
268	268	431	2	353	2	44	1	0	1	0	0	0	0	0	0	128	4	2	3	0	1	0	1	0	0	0	1	974	0	2	976	0
269	269	380	0	269	0	19	0	1	0	0	0	0	0	0	0	32	2	3	5	0	1	0	0	0	0	0	0	712	0	2	714	0
270	270	263	1	162	1	55	0	4	0	0	1	0	1	0	0	47	1	1	6	0	0	1	0	0	1	0	2	547	0	5	552	0
271	271	374	4	117	0	55	2	0	0	1	2	2	0	1	1	18	4	3	9	1	2	1	0	1	1	1	1	601	0	0	601	0
272	272	440	1	362	1	13	0	1	1	0	0	0	1	0	2	57	6	8	3	4	0	0	0	1	1	0	3	905	0	6	911	0
273	273	462	3	309	4	0	0	1	0	0	0	0	2	0	0	35	2	3	0	2	0	0	1	0	0	0	0	824	0	3	827	0
274	274	87	1	92	1	16	0	0	0	0	0	0	0	0	0	1	0	2	0	0	1	0	0	0	0	0	0	201	0	1	202	0
275	275	190	3	35	0	0	0	0	0	0	0	1	1	0	0	1	2	1	0	0	0	0	0	0	0	0	0	234	0	2	236	0
276	276	590	7	165	3	36	0	0	0	1	0	0	1	1	0	0	3	7	4	1	0	0	0	0	0	0	1	820	0	1	821	0
277	277	469	0	151	0	55	1	0	0	0	1	1	0	1	2	2	2	7	5	1	0	0	0	0	0	1	0	699	0	0	699	0
278	278	470	0	222	2	14	1	0	0	1	0	1	0	0	2	1	0	2	1	1	0	0	1	1	0	0	0	720	0	5	725	0
279	279	392	1	169	0	52	0	1	1	4	1	0	0	0	1	0	2	4	8	0	0	0	0	0	0	0	0	636	0	1	637	0
280	280	384	2	322	4	0	0	0	0	0	0	0	0	0	3	8	2	2	10	0	1	0	1	0	0	0	0	739	0	2	741	0
281	281	538	6	253	0	44	1	2	0	0	0	0	0	0	1	10	4	8	21	3	4	0	0	0	1	0	0	896	0	6	902	0
282	282	230	1	172	0	0	0	0	0	0	0	0	0	0	0	0	2	6	1	1	0	0	0	0	0	0	0	413	0	2	415	0
283	283	465	3	109	1	46	0	0	1	0	0	1	0	0	0	5	2	0	5	1	2	0	0	0	0	0	0	641	0	4	645	0
284	284	278	2	105	3	87	2	0	0	1	0	0	0	1	1	3	8	2	4	0	0	0	0	0	0	0	2	499	0	5	504	0
285	285	530	3	284	1	4	2	0	0	0	1	0	0	1	1	4	6	3	7	0	0	0	0	0	0	0	0	847	0	2	849	0
286	286	393	3	359	4	1	0	1	0	0	0	0	0	2	0	0	2	5	12	1	2	1	0	1	0	0	0	787	0	3	790	0
287	287	333	5	352	5	70	1	1	1	1	2	0	1	1	2	0	5	3	2	2	0	1	0	0	1	0	1	790	0	1	791	0
288	288	372	5	247	5	13	0	0	1	0	0	1	0	0	1	1	2	2	7	2	1	0	0	0	1	0	11	672	0	6	678	0
289	289	191	2	225	0	59	2	2	1	1	1	2	0	1	7	1	6	1	1	1	0	0	1	0	0	1	29	535	0	3	538	0
290	290	483	2	465	3	43	0	0	0	0	2	0	0	2	1	0	1	1	0	2	0	0	0	0	0	0	0	1005	0	5	1010	0
291

जिल्हास्तरीय युवा महोत्सवासाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

जालना । प्रतिनिधी - जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जालना नेहरू युवा केंद्राच्यावतीने जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे ५ डिसेंबर रोजी जालना येथील शासकीय जिल्हा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत आयोजन करण्यात आले आहे. विज्ञान व तंत्रज्ञान या संकल्पनेवर आधारित हा महोत्सव होणार आहे. तरी या जिल्हास्तरीय युवा उत्सवात सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी पुढील लिंकवर https://shorturl.at/2Z7m दि. ३ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा कार्यालयाकडून प्रसिध्दीपत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

यावर्षी १२ ते १६ जानेवारी दरम्यान राष्ट्रीय युवा महोत्सव होणार आहे. युवा महोत्सवामध्ये विज्ञान व तंत्रज्ञान या संकल्पनेवर आधारित प्रदर्शन, सांस्कृतिक स्पर्धा, लोकगीत, लोकनृत्य, कौशल्य विकास स्पर्धा, कथालेखन, चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा, कविता, हस्तकला, वस्त्रोद्योग व ॲग्रो प्रॉडक्ट व मोबाइल फोटोग्राफी अशा विविध स्पर्धांचा समावेश करण्यात आला आहे. महोत्सवात १५ ते २९ वयोगटातील युवक व युवतींना सहभागी होता येणार आहे. स्पर्धेमध्ये प्रावीण्य प्राप्त खेळाडूंना - शासनाद्वारे विविध पारितोषिके - तसेच सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. जिल्हास्तर युवा महोत्सवामध्ये प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या युवक व युवती यांची विभागस्तरावर निवड करण्यात येणार व विभागस्तरावर प्रावीण्य प्राप्त युवक, युवती यांची निवड राज्यस्तरीय महोत्सवासाठी केली जाईल. पुढे राष्ट्रीय महोत्सवाकरीता प्रावीण्य प्राप्त युवक व युवतींची निवड केली जाणार आहे.

युवा महोत्सवात जालना जिल्ह्यातील संगीत महाविद्यालय, वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालय, समाजकार्य महाविद्यालय, महिला मंडळे, सांस्कृतिक मंडळ, जिल्ह्यातील इंजिनिअरिंग महाविद्यालय, वैद्यकीय महाविद्यालय, कृषी महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शाळा, महाविद्यालये, शैक्षणिक संस्थातील युवक सहभागी होऊ शकतात. अधिक माहितीसाठी क्रीडा अधिकारी श्रीमती आरती चिल्लारे (मो.७७५८८६३९९१) व जयपाल राठोड (मो.७८७५४६४७०३) यांच्याशी संपर्क करावा. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

जागतिक एड्स दिनानिमित्त रॅलीसह जिल्ह्यात विविध उपक्रमाचे आयोजन

जालना । प्रतिनिधी - महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार दिनांक २ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ९ वाजता जिल्हा रुग्णालय जालना येथे जागतिक एड्स दिनानिमित्त प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील रॅलीची सुरवात जिल्हा रुग्णालय जालना येथून होऊन मार्ग सतकर कॉम्प्लेक्स, शनी मंदिर मार्गे होवून गांधी चमन येथे समारोप होईल. रॅलीमध्ये विद्यार्थी - विद्यार्थीनींनी मोठ्या प्रमाणात सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक, जालना यांनी केले आहे. एड्स/एचआयव्हीविषयी जनजागृती उपक्रमाचा सकारात्मक उद्देशाचे फलित, मुख्यत: अतिजोखमीच्या गटात पोहचून त्यांची तपासणी करुन एचआयव्ही पॉझिटीव्ह रुग्ण शोधणे हा आहे हा दृष्टीकोन ठेवून महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई अंतर्गत जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथकाकडून जागतिक एडस दिनानिमित्त जिल्हाभरात दि. २ ते ९ डिसेंबर २०२४ या कालावधीत चित्रकला, रांगोळी स्पर्धा, सोशल मीडिया पोस्ट मेकींग स्पर्धा, डिजीटल पोस्टर, एड्सच्या माहितीपर व्याख्याने, जनजागृतीपर कार्यशाळा अशा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. असेही कळविले आहे.

अंबड येथील निवृत्त बँक कर्मचारी मच्छिंद्र सपकाळ यांच्या खुनातील आरोपी जेरबंद

जालना स्थानिक गुन्हे शाखा आणि अंबड पोलिसांची कारवाई

जालना । प्रतिनिधी - जालन्याच्या अंबड येथील निवृत्त बँक कर्मचारी मच्छिंद्र सपकाळ यांच्या खुनातील आरोपीस पोलिसांनी जेरबंद केले आहे. जालना स्थानिक गुन्हे शाखा आणि अंबड पोलिसांनी ही संयुक्त कारवाई केलीय. मच्छिंद्र गंगाधर सपकाळ वय ६० वर्षे यांचा मृतदेह अंबड तालुक्यातील शिराढोण शिवारामध्ये अंशीराम वाबळे यांच्या शेताच्या बाजुला पडलेला मिळून आला होता. या प्रकरणी गणेश मच्छिंद्र सपकाळ वय ३५ वर्षे रा. शिरढोण यांच्या फिर्यादीवरून अंबड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास करत असताना जालना स्थानिक गुन्हे शाखा आणि अंबड पोलिसांच्या पथकाने मच्छिंद्र यांच्या मारेकऱ्याच्या मुसक्या आवळल्या आहेत. ज्ञानेश्वर दशरथ सपकाळ वय-३२ वर्षे रा. शिराढोण ता. अंबड जि. जालना असं अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. आरोपी ज्ञानेश्वर सपकाळ याच्याकडे पोलिस पथकाने गुन्ह्याच्या अनुषंगाने विचारपूस केली असताना त्याने गुन्ह्याची कबुली दिलीय. यावेळी आरोपीने

गुन्ह्याची कबुली देताना सांगितले की, मयत मच्छिंद्र सपकाळ यांनी आरोपी ज्ञानेश्वर सपकाळ याचे पहिले लग्न मोडले होते. त्यामुळे आरोपीस भरपाई करण्यासाठी मोठे आर्थिक नुकसान झाले होते. तसेच मयत मच्छिंद्र यांनी आरोपी ज्ञानेश्वर याच्या आईला मारहाण केल्याचा जुना राग मनात धरुन आरोपीने मच्छिंद्र सपकाळ यांना लाकडी दांडुक्याने डोक्यात मारुन त्यांचा खुन केला होता. या प्रकरणी गुन्हे शाखेचे पथक आणि अंबड पोलिसांच्या पथकाने आरोपीस अटक केली असून अधिक तपास पोलीस करीत आहे..

सदरची कारवाई ही पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल, अपर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी, अंबड उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल खांबे यांचे मार्गदर्शनाखाली स्था.गु.शा. चे अधिकारी पो.नि.पंकज जाधव, अंबड पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलीस निरीक्षक सतिष जाधव, सपोनि/अमोल गुरले, पोउपनि / राजेंद्र वाघ, पोउपनि / छोटुराम ठुबे, पोउपनि / भगवान नरोडे, पोहेकॉ/विष्णु चव्हाण, दीपक पाटील, सॅम्युअल कांबळे, रामप्रसाद पहुरे, लक्ष्मीकांत आडेप, सागर बाविस्कर, दत्ता वाघुंडे, देविदास भोजणे, पो.अं./ संजय क्षिरसागर, स्वप्निल भिसे, देवा डेहंगळ, अरुन मुंढे,, अक्रूर धांडगे, भागवत खरात, कैलास चेके आदींनी केलेली आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.